"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

# Newspaper Clippings

# 2022-23 – PART 4

महान कार्य | चैत्र शु. ३ अश्विन
दि.२४ मार्च २०२३

# ए.एस.सी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची खर्डेकर ग्रंथालयास भेट

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट देऊन तेथील संदर्भ ग्रंथ, थिसीस, नियतकालिके त्याचप्रमाणे आधार ग्रंथांची माहिती घेतली. यासाठी खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. सुतार सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे वि. स. खांडेकर भाषा भवनला देखील भेट देऊन विद्यार्थ्यांनी हिंदी विभागातील भाषा लॅब विषयीची माहिती येथील प्रा. डॉ. सदामते सरांकडून घेतली.

त्याचप्रमाणे श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनला भेट देऊन येथील मुख्य प्रबंधक मा. विजयसिंह यांनी विद्यार्थ्यांना रेल्वे विभागामध्ये नोकरीच्या उपलब्ध होणार्या वेगवेगळ्या संधी विषयीची माहिती दिली. या भेटीचे आयोजन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे व प्रा.अर्चना तराळ मॅडम यांनी केले.प्रा. अपर्णा कांबळे व प्रा. किशोरी टोणपे मॅडम यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, २५ मार्च २०२३



**कोल्हापूर :** बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास विद्यार्थ्यांनी भेट दिली.

# खर्डेकर ग्रंथालयास विद्यार्थ्यांची भेट

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट दिली. विद्यार्थ्यांनी संदर्भ ग्रंथ, थिसीस, नियतकालिके त्याचप्रमाणे आधार ग्रंथाची माहिती घेतली. यासाठी खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. सुतार यांनी मार्गदर्शन केले. वि. स. खांडेकर भाषा भवनलाही भेट देऊन विद्यार्थ्यांनी हिंदी विभागातील भाषा लॅबविषयीची माहिती प्रा. डॉ. सदामते यांच्याकडून घेतली. छत्रपती शाहू महाराज टर्मिनलला भेट देऊन येथील मुख्य प्रबंधक विजयसिंह यांनी विद्यार्थ्यांना रेल्वे विभागामध्ये नोकरीच्या उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या संधीविषयीची माहिती दिली. विद्यार्थ्यांना या भेटीसाठी हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे, प्रा.अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार, २५ मार्च २०२३




# डीकेएएससीच्या विद्यार्थ्यांची बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ येथील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट देऊन तेथील संदर्भ ग्रंथ, थिसीस, नियतकालिके, आधार ग्रंथाची माहिती घेतली. यासाठी ग्रंथपाल डॉ. सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. वि. स. खांडेकर भाषा भवनलाही भेट देऊन विद्यार्थ्यांनी हिंदी विभागातील भाषा लॅब विषयीची माहिती येथील प्रा. डॉ. सदामते यांच्याकडून घेतली. श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनसला भेट देऊन येथील मुख्य प्रबंधक विजयसिंह यांनी विद्यार्थ्यांना रेल्वे विभागामध्ये नोकरीच्या उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या संधीविषयीची माहिती दिली. या भेटीचे आयोजन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे, प्रा. अर्चना तराळ यांनी केले. प्रा. अंपर्णा कांबळे व प्रा. किशोरी टोणपे यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी

२५ मार्च २०२३/



दत्ताजीराव कदम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट दिली.

# कदम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची खर्डेकर ग्रंथालयास भेट

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयास भेट देऊन तेथील संदर्भ ग्रंथ, थिसीस, नियतकालिके त्याचप्रमाणे आधार ग्रंथाची माहिती घेतली. यासाठी खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे. वि. स. खांडेकर भाषा भवनला देखील भेट देऊन विद्यार्थ्यांनी हिंदी विभागातील भाषा लॅब विषयीची माहिती येथील प्रा. डॉ. सदामते सरांकडून घेतली. त्याचप्रमाणे श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनला भेट देऊन येथील मुख्य प्रबंधक मा. विजयसिंह यांनी विद्यार्थ्यांना रेल्वे विभागामध्ये नोकरीच्या उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या संधी विषयीची माहिती दिली. या भेटीचे आयोजन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे व प्रा.अर्चना तराळ यांनी केले. प्रा. अपर्णा कांबळे व प्रा. किशोरी टोणपे यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, २७ मार्च २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागातर्फे पोस्टर प्रदर्शन झाले.

## 'डीकेएएससी'मध्ये पोस्टर प्रदर्शन

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागातर्फे पोस्टर प्रदर्शन झाले. महिला वनस्पतीशास्त्रज्ञ विषयावरील या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी विविध क्षेत्रात कार्यरत महिला वनस्पतीशास्त्रज्ञांबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वनस्पती शास्त्रात योगदान देणाऱ्या जगभरातील महिलांचे कार्य प्रदर्शनातून मांडले. सूत्रसंचालन राजनंदिनी माने यांनी केले. गायत्री साळुंखे हिने आभार मानले. सौ. बी. एस. दोपारे, डॉ. यु.ए.देसाई, डॉ. मधुमती शिंदे, डॉ. आम्रपाली कट्टी, प्रा.आरती खोत, डॉ.वर्षा दवंडे, डॉ. संदीप गावडे, डॉ. लीना खाडे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, बुधवार, २९ मार्च २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये बेस्ट फ्रॉम वेस्ट प्रदर्शन झाले.

## डीकेएएससी कॉलेजमध्ये प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये बेस्ट फ्रॉम वेस्ट प्रदर्शन झाले. वनस्पतीशास्त्र विभागाच्या पुढाकाराने प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ साधने बनवली. उपप्राचार्य प्रा. डि. ए. यादव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. रुपाली सांभारे व प्रा. भारती कोळेकर उपस्थित होत्या. डॉ. एस. टी. इंगळे यांनी टाकाऊपासून टिकाऊबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अभिलाषा कोरे यांनी केले. सूत्रसंचालन राजनंदिनी माने यांनी केले. आभार गायत्री साळुंखे यांनी मानले. भारती दोपारे, डॉ. मधुमती शिंदि, डॉ. आम्रपाली कट्टी, डॉ. संदीप गावडे, डॉ. उदयसिंह देसाई, प्रा. आरती खोत, ऊर्मिला चौगुले, डॉ. वर्षा दवंडे, डॉ. लीना खाडे, डॉ. संदीप गावडे, भारत देसाई आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

**सकाळ** कोल्हापूर, गुरुवार, ३० मार्च २०२३



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात अवकाश दर्शनाचा कार्यक्रम झाला.**

# 'डीकेएएससी'मध्ये अवकाश दर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात भूगोलशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी अवकाश दर्शनाचा कार्यक्रम झाला. काल (ता. २८) सूर्यास्तानंतर अवकाशात एकाच वेळी पाच ग्रह पाहायला मिळण्याची अत्यंत दुर्मिळ अवकाशीय घटना ही पर्वणी उपलब्ध झाली. बुध, शुक्र, मंगळ, गुरू आणि युरेनस हे चंद्राभोवती धनुष्याकृती रेषेत आकाशात एकाच वेळी पाहण्याची ही संधी विद्यार्थ्यांनी अनुभवली. सूर्यास्तानंतर सायंकाळी साडेसहा ते आठ या वेळेत हा कार्यक्रम आयोजित केला होता. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी भौतिकशास्त्र विभागाकडील प्रा. सूरज पठाण यांचे तांत्रिक सहाय्य मिळाले. डॉ. अतिश पाटील, प्रा. सचिन जाधव, डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्रा. अक्षय स्वामी, प्रा. अवधूत ढोकरे, प्रा. सौरभ मोरे, प्रकाश गिरी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व भूगोलशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

Scanned with CamScanner

महान कार्य
चैत्र शु.१० पुष्य
दि.३१ मार्च २०२३

# डीकेएससीच्या विद्यार्थ्यांनी घेतला अवकाश दर्शनाचा लाभ

**इचलकरंजी / महान कार्य वृत्तसेवा**

ता. २८ रोजी सूर्यास्तानंतर अवकाशात एकाचवेळी पाच ग्रह पाहायला मिळण्याची अत्यंत दुर्मिळ अवकाशीय घटना ही पर्वणी उपलब्ध झाली. बुध, शुक्र, मंगळ, गुरू आणि युरेनस हे चंद्राभोवती धनुष्याकृती रेषेत आकाशात एकाच वेळी पाहण्याची ही संधी विद्यार्थ्यांनी अनुभवली.

सूर्यास्तानंतर सायंकाळी साडेसहा ते आठ या वेळेत हा कार्यक्रम आयोजित केला होता.



उपप्राचार्य प्रा. डी. एं. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी भौतिकशास्त्र विभागाकडील प्रा. सूरज पठाण यांचे तांत्रिक सहाय्य मिळाले. डॉ. अतिश पाटील, प्रा. सचिन जाधव, डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्रा. अक्षय स्वामी, प्रा. अवधूत ढोकरे, प्रा. सौरभ मोरे, प्रकाश गिरी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व भूगोलशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

Scanned with CamScanner

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सव

इचलकरंजी, ता. २ : महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, आत्मनिर्भरता, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, प्रेरणा, धाडस, तसेच सहनशीलता निर्माण व्हावी या उद्देशाने डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सव झाला. कॉमर्स व बी. कॉम. आयटी विभगाच्या विद्यार्थ्यांनी हा व्यावसायिक उपक्रम घेतला. शहराचा सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय विकास कसा साध्य होईल यासाठी उपक्रमाचे आयोजन केले होते.

व्यापार महोत्सवाचे उद्‌घाटन सौरभ शेट्टी यांनी केले. व्यापार महोत्सव या प्रत्यक्ष उपक्रमातून पदवीनंतर नोकरीबद्दल असणारी उदासीनता कमी होणार आहे. यामुळे विद्यार्थी व्यापार, व्यवसाय, उद्योग व नवनिर्मितीकडे आकर्षित होतील आणि त्यांच्यामध्ये मूल्यांची जोपासना व संशोधन वृत्ती वृद्धिंगत होईल, असे मत शेट्टी यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ अनिल पाटील म्हणाले, 'विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्यासाठी अशा उपक्रमांचा निश्चितच फायदा होणार आहे. नेतृत्व, संभाषण कौशल्य आदी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव तसेच अनुभव प्राप्त होतील महाविद्यालयाने ही अनोखी व प्रेरणादायी संधी उपलब्ध करून दिली आहे.'



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात व्यापार महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी सौरभ शेट्टी, प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.**

व्यापार महोत्सवाध्ये विविध खाद्यपदार्थ, रेडीमेड कपडे, सौंदर्याच्या वस्तू, इमिटेशन ज्वेलरी, मोबाईल ॲक्सेसरीज, सेंद्रिय गुळ आदी विविध स्टॉल्स मांडले होते. स्वयंरोजगार , व्यवस्थापन जमाखर्च व हिशेब ठेवणे, स्टॉल मांडणी व व्यवस्थापन तसेच ग्राहकांशी संवाद, संघटन कार्य, सराव आदी कामे विद्यार्थ्यांनी केली.

स्वागत व प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन संचित लांडगे, सोनाली पारिख यांनी केले. आभार आय. टी. समन्वयक प्रा. डॉ. आर. एस. रॉड्रिक्स यांनी मानले. प्रा. मृणाली पाटील, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. मेघा माने, प्रा. मनोज जाखले यांनी परिश्रम घेतले. सर्वच विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी महोत्सवात सहभाग घेतला.

Kolhapur, Ichalkaranji-Today
03/04/2023 Page No. 3

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात भरड धान्य विषयावरील आयोजित व्याख्यानात डॉ. सुभाष इंगळे यांचे स्वागत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले.

## भरड धान्यावर व्याख्यान

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात भरड धान्य सर्वोत्कृष्ट सकस आहार, या विषयावर व्याख्यान झाले. प्रमुख वक्ते डॉ. सुभाष इंगळे यांनी मार्गदर्शन केले. अनेक धान्याच्या अतिवापरामुळे जीवघेणे आजार वाढत चालले आहेत. आपला दैनंदिन आहार बदलून भरड धान्याचा वापर केल्यास आरोग्य सुदृढ राहू शकते. भरड धान्याचे लोप पावत चाललेले प्रमाण वाढवल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळू शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. डॉ. संजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डी. ए. यादव यांनी आभार मानले. प्रा. भारती कोळेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. प्रभा पाटील, डॉ. विनायक गाणबावले, डॉ. सागर सुतार, डॉ. पद्मश्री वाघमारे उपस्थित होते.

Kolhapur, Ichalkaranji-Today
03/04/2023 Page No. 2

सकाळ

# इचलकरंजीत मराठी समाजशास्त्र परिषदेचे बुधवारपासून अधिवेशन

इचलकरंजी, ता.२ : दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन बुधवारी (ता. ५) व गुरुवारी (ता. ६) होणार आहे. मराठी समाजशास्त्र परिषद आणि डीकेएएससी महाविद्यालयातर्फे आयोजन केले आहे. अधिवेशनात देशभरातून २५० अभ्यासक, संशोधक उपस्थित राहणार आहेत

इचलकरंजी परिसरातील औद्योगिकीकरणाने झालेले हवा प्रदूषण, पंचगंगा जलप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण इत्यादींनी पर्यावरणाचा ढासळलेला समतोल याबरोबरच जंतुनाशकांच्या वापरांनी पिकवलेली अन्नधान्ये-भाजीपाला, फळे यांतून कर्करोग व इतर आरोग्य समस्या, वस्त्रोद्योगातील व्यावसायिक व कामगारांचे प्रश्न यांसह वैश्विक सामाजिक समस्या या अधिवेशनाची प्रमुख सूत्रे आहेत. स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे उद्घाटक, तर डॉ. गोपाळ गुरु (मुंबई) बीजभाषक आहेत. अधिवेशनात चार परिसंवाद होतील. समाजशास्त्रातील तज्ज्ञ अभ्यासक समकालीन सामाजिक समस्यांबाबत विचार मांडणार आहेत. मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. अशोक बोरकर, कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अधिवेशनाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. अर्जुन जाधव, सहसमन्वयक डॉ. रूपाली सांभारे व प्रा. मयुरेश पाटील काम पाहत आहेत. प्रा. मच्छिंद्र कांबळे सल्लागार म्हणून मार्गदर्शन करीत आहेत. या अधिवेशनास उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले आहे.

## १२९ शोधनिबंधांचे होणार वाचन

अधिवेशनात देशभरातून २५० अभ्यासक, संशोधक उपस्थित राहणार आहेत. १२९ शोधनिबंधांचे वाचन होऊन चर्चा करण्यात येणार आहे. सात सत्रांमध्ये विभागलेल्या या अधिवेशनाचा पुरस्कार वितरण होऊन समारोप होणार आहे. अधिवेशनात वाचल्या जाणाऱ्या शोधनिबंधांचा समावेश असलेली मराठी समाजशास्त्र परिषदेची ``संशोधन पत्रिका`` ग्रंथ स्वरूपात प्रसिद्ध होणार आहे.

Kolhapur, Main
03/04/2023 Page No. 5

महान कार्य

चैत्र शु. १३, मघा
दि. ३ एप्रिल, २०२३

# डीकेएएससीमध्ये मराठी समाजशास्त्र राष्ट्रीय अधिवेशन

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन बुधवारी (ता. ५) व गुरुवारी (ता. ६) होणार आहे. मराठी समाजशास्त्र परिषद आणि डीकेएएससी महाविद्यालयातर्फे आयोजन केले आहे.

Scanned with CamScanner



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले डी.के. ए.एस.सी. महाविद्यालयाचे खेळाडू.

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी महाविद्यालयाचे खेळाडू करण राजू घुणके, पवण बाळू कोळी, कौस्तुभ करण पोकार्डे, दर्शन दत्तात्रय पवार तसेच महिला संघात पिया मारुती चव्हाण यांची पंजाब युनिव्हर्सिटी, पतियाला येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कयाकिंग आणि कनोईंग सर्धेत के-१, के-२ व सी -१, सी- २ या प्रकारात या खेळाडूंनी यश संपादन केले. खेळाडूंचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार केला. प्रा. मेजर एम. जे. विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

केसरी

9921600800

3-4-2023

# डी.के.ए.एस.सी. मध्ये भरड धान्यावर व्याख्यान

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्‌र्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक प्रबोधिनी उपक्रमात डॉ. सुभाष इंगळे यांचे 'भरडधान्य सर्वोत्कृष्ट सकस आहार' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. ते म्हणाले, हे वर्ष भारताने पुरस्कृत केल्यानुसार 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. आपण आहार बदलून भरड धान्यांचा वापर केल्यास आपले आरोग्य सदृढ ठेवू शकतो. समारंभात डॉ. अंजली उबाळे, डॉ. वर्षा शिंदे, डॉ. स्नेहा कुंभार, डॉ. संदीप गावडे, डॉ. सुभाष इंगळे यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार केले. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार, आभार प्रा. डी. ए. यादव यांनी केले. समारंभास डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. प्रभा पाटील, डॉ. विनायक गाणबावले, डॉ. सागर सुतार, डॉ. पद्मश्री वाघमारे यांची उपस्थिती लाभली.

केसरी

9921600800

3-4-2023



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथील विद्यार्थ्यांसाठी अवकाश दर्शनाचा कार्यक्रम झाला.

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात अवकाश दर्शनाचा कार्यक्रम

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथील विद्यार्थ्यांसाठी अवकाश दर्शनाचा कार्यक्रम झाला. दि. २८ मार्च रोजी सूर्यास्तानंतर अवकाशात एकाचवेळी पाच ग्रह पाहायला मिळण्याची अत्यंत दुर्मीळ अवकाशीय़ घटना पाहण्याची पर्वणी उपलब्ध झाली. सूर्यास्त झाल्यानंतर बुध, शुक्र, मंगळ, गुरू आणि युरेनस हे चंद्राभोवती धनुष्याकृती रेषेत आकाशात एकाच वेळी पाहण्याची ही अत्यंत अनोखी संधी होती. सूर्यास्तानंतर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. अतिश पाटील, प्रा. सचिन जाधव, डॉ.नवनाथ नाईकनवरे, प्रा.अक्षय स्वामी, यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. अनिल पाटील` यांचे मार्गदर्शन लाभले.

केसरी

9921600800

3-4-2023

तरुण भारत संवाद
मंगळवार, ४ एप्रिल २०२३

# इचलकरंजीत मराठी समाजशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन

## ५, ६ एप्रिलला देशभरातून २५० अभ्यासक, संशोधक होणार सामील : १२९ शोधनिबंधांवर चर्चासत्र

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन ५ व ६ एप्रिल रोजी आयोजित केले आहे. अधिवेशनास देशभरातून २५० अभ्यासक, संशोधक उपस्थित राहणार आहेत. १२९ शोधनिबंधांचे वाचन होऊन चर्चा होणार आहे.

मराठी समाजशास्त्र परिषद आणि डीकेएएससी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विभाग त्याचे संयोजन करीत आहे. इचलकरंजी परिसरातील औद्योगिकीकरणाने झालेले हवा प्रदूषण, पंचगंगा जलप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण इत्यादींनी पर्यावरणाचा ढासळलेला समतोल याबरोबरच जंतूनाशकांच्या वापरांनी पिकवलेली अन्नधान्ये, भाजीपाला, फळे यातून कॅन्सर व इतर आरोग्य समस्या, वस्त्रोद्योगातील व्यावसायिक व कामगारांचे अनेक प्रश्न यासह वैश्विक सामाजिक समस्या असे प्रमुख सूत्र घेऊन पर्यावरण, कामगार ,आरोग्य आणि वैश्विक समाज यावर हे अधिवेशन होणार आहे.

अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. अधिवेशनाचे बीजभाषक इकॉनॉमिक अँण्ड पॉलिटिकल विकली, मुंबईचे मुख्य संपादक डॉ. गोपाळ गुरु आहेत.

अधिवेशनात चार परिसंवाद आयोजित केले असून समाजशास्त्रातील तज्ज्ञ अभ्यासक समकालीन सामाजिक समस्यांबाबत विचार मांडणार आहेत. सात सत्रांमध्ये विभागलेल्या या अधिवेशनाचा पुरस्कार वितरण होऊन समारोप होणार आहे. अधिवेशनात वाचल्या जाणाऱ्या शोधनिबंधांचा समावेश असलेली मराठी समाजशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका ग्रंथ स्वरूपात प्रसिद्ध होणार आहे.

अधिवेशनास मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. अशोक बोरकर, कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के यांच्याबरोबर सर्व कार्यकारिणी सदस्य, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे. समन्वयक म्हणून प्रा. डॉ. अर्जुन जाधव, सहसमन्वयक डॉ. रूपाली सांभारे व प्रा. मयुरेश पाटील कामकाज पाहत आहेत. त्यांना संस्था व विविध विद्यापीठांतील समाजशास्त्रचे अभ्यासक, महाविद्यालयाचे माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. मच्छिंद्र कांबळे सल्लागार म्हणून मार्गदर्शन करीत आहेत. सामाजिक परिवर्तन आणि कामगार चळवळीचे केंद्र असलेल्या इचलकरंजी औद्योगिक वस्त्रनगरीत होत असलेल्या या समाज प्रबोधनपर महत्त्वपूर्ण अधिवेशनास समाजहितचिंतकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले आहे.

सकाळ



**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या कार्यशाळेत सहभागी झालेले प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.

# डीकेएएससी महाविद्यालयात 'कौशल्य विकास'वर कार्यशाळा

**इचलकरंजी, ता. ४ :** डीकेएएससी महाविद्यालयात वाणिज्य विभाग व येथील सीए शाखेतर्फे पाचदिवसीय कार्यशाळा झाली. कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास तसेच अकौंटिंग, ऑडिटिंग, प्राप्तिकर व जीएसटी अशा विविध विषयांशी संबंधित कार्यशाळा घेतली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व सीए शाखेचे चेअरमन सीए शहेनशहा मुजावर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

पहिल्या दिवशी सीए भूषण चावरे यांनी कौशल्य विकास याबाबत विवेचन केले. दुसऱ्या दिवशी शिष्टाचार व व्यक्तिमत्व विकास याबाबत सीए विजय दुधारकर म्हणाले, 'स्वयंशिक्षणाचा कौशल्याशी संबंध आहे. यशस्वी होण्यामागची कारणे, परिणाम या चांगल्या जीवनाची गुरुकिल्ली आहे.' तिसऱ्या दिवशी सीए सागर मकोटे यांनी आयकराच्या विविध संकल्पना जसे कर रचना, आकार, एकूण उत्पन्न, विविध सवलती ,व्यवसायाचा नफा, रिबेट आदी माहिती सविस्तरपणे सांगितली. सीए पवन मालू यांनी वस्तू व सेवा कर याबाबत माहिती देत त्याची प्राथमिकता, वैशिष्ट्ये रचना, नोंदणी, विविध फायदे, आकार, मिळणारे उत्पन्न, त्याची परिणामकारकता स्पष्ट केली. पाचव्या दिवशी सीए दीपक बसुदे यांनी आयकरातील टीडीएस तरतुदींचा आढावा, विविध घटकांवर होणारा परिणाम सूट, सवलती, गरज याविषयी भाष्य केले. प्राचार्य अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना नवनवीन कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेत सहभाग घेतलेल्या कॉमर्स व आयटी विभागाच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक असोसिएशनचे चेअरमन सीए शहेनशहा मुजावर व सीए मुकेश मालानी यांनी केले. विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील यांनी स्वागत केले. आभार प्रा. डॉ. आर. एस. रॉड्रिक्स यांनी मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
05/04/2023 Page No. 3

सकाळ कोल्हापूर, बुधवार, ५ एप्रिल २०२३

## डीकेएएससी महाविद्यालयातर्फे अभ्यास सहल

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे अभ्यास सहलीचे आयोजन केले. शिवाजी विद्यापीठ इंग्रजी विभाग भाषाविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. भाषाशास्त्र प्रयोगशाळेला भेट देवून डॉ. सुरेंद्र उपरे यांच्याकडून माहिती जाणून घेतली. यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व वृक्षसंवर्धनाविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील लीड बोटॅनिकल गार्डनला भेट दिली. सर्व वनस्पती व गार्डनची माहिती संशोधक विद्यार्थी आदित्य मगदूम यांनी दिली. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाला भेट देवून ग्रंथालयातील विविध विभागांची व्यवस्था तसेच इंग्रजी व इतर विषयांची पुस्तके, संदर्भ ग्रंथांची उपलब्धता याबद्दल माहिती घेतली. अभ्यास सहलीचे आयोजन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर, प्रा.सौ. केशर धरणगुत्ते, प्रा. श्रद्धा बरगाले आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, ५ एप्रिल २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात अवकाश दर्शनास प्रतिसाद

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या भूगोलशास्त्र विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी अवकाश दर्शनाचा कार्यक्रम झाला. आज सूर्यास्तानंतर अवकाशात एकाचवेळी पाच ग्रह पाहायला मिळण्याची अवकाशीय घटना पाहण्याची पर्वणी विद्यार्थ्यांना लाभली. बुध, शुक्र, मंगळ, गुरू आणि युरेनस हे चंद्राभोवती धनुष्याकृती रेषेत आकाशात एकाच वेळी पाहण्याच्या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. भौतिकशास्त्र विभागांकडील प्रा. सुरज पठाण यांचे तांत्रिक सहाय्य मिळाले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. अतिश पाटील, प्रा. सचिन जाधव, डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्रा. अक्षय स्वामी, प्रा. अवधूत ढोकरे, प्रा. सौरभ मोरे, प्रा. चेतन पाटील, प्रा. विजय सूर्यवंशी, प्रा. अशोक कोळी, अधीक्षक सुनील महाडिक, प्रकाश कुराडे, प्रकाश गिरी, विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

महान कार्य
चैत्र शु.१४ उत्तरा फाल्गुनी
दि.५ एप्रिल २०२३

# डीकेएएससीमध्ये संविधान प्रबोधन कार्यशाळा

**इचलकरंजी:** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेजमध्ये समान संधी केंद्राद्वारे संविधान प्रबोधन संवाद कार्यशाळा झाली.कार्यशाळेत अमोल पाटील साधक व्यक्ती म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले,'स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, राष्ट्राची एकता व एकात्मता महत्त्वाची आहे. त्यासाठी आर्थिक व सामाजिक न्याय, सन्मानाचे राहणीमान व लोकशाहीची मूल्ये ह्या बाबी भारतीयांसाठी आवश्यक आहेत.'

प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, 'आपले संविधान म्हणजे आपला सन्मान आहे. मानवी हक्क अबाधित ठेवण्याचे कार्य संविधानातूनच होते. संविधानातील कलमांची मोडतोड वाचवण्यासाठी संविधानांचे वाचन तसेच आत्मपरीक्षण गरजेचे आहे.' कार्यशाळेत छत्रपती शाहू महाराजांच्या ऐतिहासिक निर्णयांनाही उजाळा दिला. समाज कल्याण विभागाच्या समता दूत पूजा धोत्रे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यालयीन सेवक वरुटे, समितीचे सदस्य प्रा. विशाल कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक व हेतू कथन विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इंगळे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
५ एप्रिल २०२३/५

# दत्ताजीराव कदम कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहल

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी इंग्रजी विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहली काढण्यात आली. यावेळी इंग्रजी विभागाच्यावतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील इंग्रजी विभाग भाषा विभाग प्रमुख, डॉ. तृप्ती करेकट्टी यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. भाषाशास्त्र प्रयोगशाळेला भेट दिली व डॉ. सुरेंद्र उपरे यांच्याकडून माहिती घेतली. यानंतर लीड बोटॅनिकल गार्डन येथे भेट देऊन सर्व वनस्पतीची माहिती संशोधक विद्यार्थी आदित्य मगदूम यांनी दिली. सहलीचे आयोजन डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले.

CS Scanned with CamScanner

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
बुधवार, ५ एप्रिल २०२३

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे आज अधिवेशन

**कोल्हापूर :** इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन ५ व ६ एप्रिल रोजी आयोजित केले आहे.

इचलकरंजी परिसरातील औद्योगिकीकरणाने झालेले हवा प्रदूषण, पंचगंगा जलप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण इत्यादींनी पर्यावरणाचा ढासळलेला समतोल याबरोबरच जंतुनाशकांच्या वापरांनी पिकवलेली अन्नधान्ये-भाजीपाला, फळे यांतून कॅन्सर व इतर आरोग्य समस्या, वस्त्रोद्योगातील व्यावसायिक व कामगारांचे अनेक प्रश्न यांसह वैश्विक सामाजिक समस्या असे प्रमुख सूत्र घेऊन ह्य पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज ह्य या विषयावर हे अधिवेशन होणार आहे. बीजभाषन ज्येष्ठ संपादक डॉ. गोपाळ गुरू करणार आहेत. चार परिसंवाद आणि १२९ शोधनिबंधांचे वाचन होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सोमवारी दिली.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
५ एप्रिल २०२३/४

# इचलकरंजीत आज राष्ट्रीय अधिवेशन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३२ वे राष्ट्रीय अधिवेशन ५ व ६ एप्रिल रोजी आयोजित केले आहे. मराठी समाजशास्त्र परिषद आणि डी. के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विभाग त्याचे संयोजन करीत आहे. इचलकरंजी परिसरातील औद्योगिकीकरणाने झालेले हवा प्रदूषण, पंचगंगा जलप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण इत्यादींनी पर्यावरणाचा ढासळलेला समतोल याबरोबरच जंतूनाशकांच्या वापरांनी पिकवलेली अन्नधान्ये-भाजीपाला, फळे यांतून आरोग्य समस्या, वस्त्रोद्योगातील व्यावसायिक व कामगारांचे अनेक प्रश्न यांसह वैश्विक सामाजिक समस्या असे प्रमुख सूत्र घेऊन 'पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज' या विषयावर हे अधिवेशन होणार आहे. उद्घाटक म्हणून कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आहेत. अधिवेशनाचे बीजभाषक डॉ. गोपाळ गुरु यांना पाचारण करण्यात आले आहे. अधिवेशनात एकूण चार परिसंवाद होणार आहेत.

Scanned with CamScanner

सकाळ

# विकासाच्या प्रक्रियेत शहाणपणाचा अभाव

## गोपाळ गुरू; इचलकरंजीत मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनास प्रारंभ

**इचलकरंजी, ता. ५ :** वस्त्रनगरीतील समाजशास्त्र आणि पर्यावरणाचा एकत्रित विचार करणारे हे अधिवेशन अभिनव आहे. समाजशास्त्राच्या संकल्पनांपलीकडे जाऊन आपण नवे कळीचे प्रश्न घेऊन संशोधन करीत आहोत, ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. आज विकासाच्या प्रक्रियेत विवेक जागा आहे, पण शहाणपणाचा अभाव आहे. वस्तुस्थिती पाहता सम्यक शहाणपणाची नितांत आवश्यकता आहे. या अधिवेशनात संशोधकांकडून पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज याबाबत सम्यक शहाणपणाचा शोध घेतला जाणार आहे,असे प्रतिपादन डॉ. गोपाळ गुरू (मुंबई) यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित डीकेएएससी महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या दोन दिवसीय ३२ व्या राष्ट्रीय अधिवेशनास प्रारंभ झाला. यावेळी ते प्रमुख बीजभाषक म्हणून बोलत होते. डीकेएएससी महाविद्यालय व मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विभागाने या अधिवेशनाचे संयोजन केले आहे. अधिवेशनाचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन .पवार यांचा समाजशास्त्रातील समृद्ध योगदानाबद्दल 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला.



**इचलकरंजी : मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. गोपाळ गुरू (मुंबई) यांनी बीजभाषण केले. व्यासपीठावर प्रा. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी उपस्थित होते.**

तसेच अधिवेशनात वाचल्या जाणाऱ्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा २८ वा अंक प्रकाशित करण्यात आला. कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ.रमेश जाधव तसेच मीनलबेन मेहता, समाजशास्त्राचे अभ्यासक डॉ. सतीश देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत यांनी केले. सचिव डॉ. अशोक बोरकर यांनी मानपत्राचे वाचन केले.

आभार समन्वयक डॉ. अर्जुन जाधव यांनी मानले. सहसमन्वयक प्रा. मयुरेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहसमन्वयक डॉ.रूपाली सांभारे आणि डॉ.अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अधिवेशनात देशभरातील संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी परिसंवादांमधून विविध विषयांवर चर्चा घडून आली.

### आजचे सत्र

- सकाळी ९ : शोधनिबंधांचे वाचन व चर्चा
- सकाळी ११ : 'महात्मा जोतिबा फुले : सत्यशोधक समाजाची १५० वर्षे' या विषयावर परिसंवाद
- दुपारी २ : प्रा. डॉ. विनोद निरभवणे यांच्या 'झोपडपट्टी-सामाजिक समस्या' या पुस्तकाचे प्रकाशन
- पुरस्कार वितरण व समारोप समारंभ

Kolhapur, Main
06/04/2023 Page No. 5

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, गुरुवार, दि. ६ एप्रिल २०२३

# निसर्गाला ओरबाडणे म्हणजे विनाश

## डॉ. गोपाळ गुरू : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय अधिवेशनास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : पर्यावरण हा सातत्याने विचार करण्याचा गंभीर विषय आज सर्व ज्ञान शाखांसमोर आहे. विकासाच्या प्रक्रियेत विवेक जागा आहे; पण शहाणपणाचा अभाव आहे. निसर्गाला ओरबाडणे म्हणजे आपला विनाश ओढवून घेणे हे मानवी भवितव्याच्या दृष्टीने कळणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार डॉ. गोपाळ गुरू यांनी व्यक्त केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालय व मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३२ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते झाले. यावेळी बीज भाषणात गुरू बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल पाटील होते.

गावडे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आपले जीवन बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी समर्पित केल्याचे सांगून संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच



इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. गोपाळ गुरू यांनी मार्गदर्शन केले.

नकारात्मक बनत असलेल्या दिशाहीन युवा पिढीला आपण एकत्रित आणायला हवे. पर्यावरणाचा समतोल साधत तेढ आणि द्वेषविरहित एकसंघ समाज घडविण्याचे कार्य या अधिवेशनातून घडेल, अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक गौरव करण्यात आला. मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा अंक प्रकाशित करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पाटील यांनी संस्थेप्रति कृतज्ञता व समाजशास्त्र परिषदेचे आभार मानले. डॉ. राहुल भगवत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. अशोक बोरकर, धनंजय सोनटक्के, रमेश जाधव, मीनलबेन महेता, मयुरेश पाटील, सतीश देसाई यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

पुढारी

गुरुवार, ६ एप्रिल २०२३

# विकासाच्या प्रक्रियेत विवेक जागा आहे, पण शहाणपणाचा अभाव

## डॉ. गोपाळ गुरू, मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनास प्रारंभ

**इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा**

आज विकासाच्या प्रक्रियेत विवेक जागा आहे, पण शहाणपणाचा अभाव आहे. वस्तुतः सम्यक शहाणपण आज नितांत आवश्यक आहे, असे मत डॉ. गोपाळ गुरू यांनी व्यक्त केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनास प्रारंभ झाला. विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.

बीजभाषक म्हणून डॉ. गोपाळ गुरू यांची प्रमुख उपस्थिती होती. ते म्हणाले, समाजशास्त्र आणि पर्यावरण एकत्रित विचार करणारे हे अधिवेशन अभिनव आहे. समाजशास्त्राच्या संकल्पनांपलीकडे जाऊन आपण नवे कळीचे प्रश्न घेऊन संशोधन करीत आहोत, ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. पर्यावरण हा सातत्याने विचार करण्याचा गंभीर विषय आज सर्व ज्ञानशाखांसमोर आहे. निसर्गाला ओरबाडणे म्हणजे आपला विनाश ओढवून घेणे, हे मानवी भवितव्याच्या दृष्टीने कळायला हवे.



**इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलताना डॉ. गोपाळ गुरू.**

पूर्व पिढ्यांच्या भक्कम पायावर उभा असलेल्या समाजाला तरुणांच्या मजबूत खांद्यांची गरज असते. आज नकारात्मक बनत असलेल्या दिशाहीन युवा पिढीला आपण एकत्रित आणायला हवे. पर्यावरणाचा समतोल साधत तेढ आणि द्वेषविरहित एकसंघ समाज घडवण्याचे कार्य अशा अधिवेशनांमधून घडवले जाईल, अशी आशा आहे, असे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. एस. एन. पवार यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अशोक बोरकर यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. रमेश जाधव, डॉ. सतीश देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. सहसमन्वयक प्रा. मयूरेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहसमन्वयक डॉ. रूपाली सांभारे आणि डॉ. आतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. अर्जुन जाधव यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

# लीड बोटॅनिकल गार्डनला विद्यार्थ्यांची भेट

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी इंग्रजी विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील इंग्रजी विभाग भाषाविभाग प्रमुख, डॉ. तृप्ती करेकट्टी यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली.तसेच भाषाशास्त्र प्रयोगशाळेला भेट दिली व डॉ. सुरेंद्र उपरे यांच्याकडून माहिती घेतली. यानंतर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व वृक्षसंवर्धनाविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी लीड बोटॅनिकल गार्डन वनस्पतीशास्त्र विभाग येथे भेट दिली. तेथे सर्व वनस्पती व गार्डनची माहिती संशोधक विद्यार्थी आदित्य मगदूम यांनी दिली. त्यानंतर बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय येथे भेट दिली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील विविध विभागांची व्यवस्था आणि इंग्लिश व इतर विषयांची पुस्तकांची , संदर्भ ग्रंथांची उपलब्धता याबद्दल माहिती जाणून घेतली.

केसरी

9921600800

6-4-2023

साप्ताहिक इचलकरंजी समाचार    गुरुवार दि. ६-४-२०२३

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात ट्रेड फेअर उत्साहात संपन्न

इचलकरंजी–येथील डी.के.ए.एस.सी महाविद्यालयात कॉमर्स व बी.कॉम.आय टी विद्यार्थ्यांनी नुकताच ट्रेड फेअर (व्यापार महोत्सव) हा व्यावसायिक उपक्रम हाती घेतला. इचलकरंजी या वस्त्र व श्रमनगरीत सर्व घटकांमध्ये श्रमाची परंपरा आहेच , त्याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यात कौशल्य विकास, आत्मनिर्भरता, जिद्द, चिकाटी ,आत्मविश्वास, प्रेरणा, धाडस, तसेच सहनशीलता निर्माण व्हावी या उद्देशाने सदरच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

सामाजिक,आर्थिक व पर्यावरणीय विकास कसा साध्य होईल या दुय्यम हेतूनेही सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ट्रेड फेअर चे उद्घाटन स्वाभिमानी विद्यार्थी परिषद चे



संस्थापक श्री सौरभ शेट्टी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ते बोलताना म्हणाले की ट्रेड फेअर या प्रत्यक्ष उपक्रमातून पदवीनंतर नोकरीबद्दल असणाऱ्या उदासीनतेमुळे विद्यार्थी वर्गात छोट्या मोठ्या व्यापार, व्यवसाय, उद्योग व नवनिर्मितीकडे युवा शक्ती आकर्षित होईल, त्यांच्यामध्ये मूल्यांची जोपासना व संशोधन व्रुतीही व्रुध्दिगत होईल.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ अनिल पाटील होते , ते बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविण्यासाठी अशा उपक्रमांचा निश्चितच फायदा होईल. नेतृत्व, संभाषण कौशल्य, विद्यार्थ्यांच्यां कला गुणांना वाव तसेच अनुभव प्राप्त होतील, असा आशावादही मा.प्राचार्यांनी व्यक्त केला. महाविद्यालयात ही अनोखी व प्रेरणादायी संधी उपलब्ध केल्याचे समाधानही मा. प्राचार्यांनी व्यक्त केले.

स्वयरोजगार , व्यवस्थापन , जमाखर्च व हिशेब ठेवणे, स्टॉल मांडणी व व्यवस्थापन तसेच ग्राहकांशी संवाद, संघटन कार्य, सराव इ विविध कार्ये विद्यार्थ्यांनी पार पाडलीत. प्रास्ताविक, विभाग प्रमुख प्रा विजय पाटील यांनी केले, महोत्सवात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कु.संचित लांडगे व कु सोनाली पारिख यांनी केले, आभार आय. टी. समन्वयक प्रा डॉ आर. एस. रॉड्रिक्स यांनी व्यक्त केले. कॉमर्स विभागाच्या प्रा मृणाली पाटील,प्रा पल्लवी होगाडे, प्रा मेघा माने, प्रा.एम.एम.महाजन, प्रा.मनोज जाखले यांनी विशेष परिश्रम घेतले. माजी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी व सर्व प्राध्यापकांनी ह्या महोत्सवात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार, ७ एप्रिल २०२३

# ‘स्वामी विवेकानंदांच्या साहित्यात सामाजिक बदलांचा मूलभूत विचार’

## समाजशास्त्र परिषद राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

इचलकरंजी, ता. ६ : स्वामी विवेकानंदांचे साहित्य हे सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे साहित्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ संशोधक डॉ.प्रदीप आगलावे (नागपूर) यांनी केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात दोन दिवसीय समाजशास्त्र परिषदेच्या ३२ व्या राष्ट्रीय अधिवेशनाची आज सांगता झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी. संचालक डॉ. आर.बी. पाटील होते.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या विविध पुरस्कारांचे वितरण झाले. डॉ. विनोद निरभवणे यांच्या ''झोपडपट्टी: सामाजिक समस्या'' या ग्रंथाचे प्रकाशनही झाले.

१२९ शोधनिबंधांचे वाचन झाले. महात्मा ज्योतिबा फुले : सत्यशोधक समाजाची १५० वर्षे या विषयावर परिसंवादझाला. डॉ. अर्चना जगतकर, डॉ. राहुल कोसंबी, डॉ. प्रतिभा अहिरे यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी डॉ. मच्छिंद्र सकटे होते.

यजमान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील व संयोजक डॉ. अर्जुन जाधव यांचा सत्कार झाला. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. अशोक बोरकर, कोषाध्यक्ष डॉ.धनंजय सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले. डॉ. रूपाली सांभारे यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ.अतिश पाटील यांनी केले. प्रा. मयुरेश पाटील यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

# समाजशास्त्राच्या संकल्पनांपलीकडे जाऊन संशोधन करायला हवे

## डॉ. गोपाळ गुरु : मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** समाजशास्त्र आणि पर्यावरण एकत्रित विचार करणारे हे अधिवेशन अभिनव आहे, म्हणूनच ते अभिनंदनीय आहे. समाजशास्त्राच्या संकल्पनांपलीकडे जाऊन आपण नवे कळीचे प्रश्न घेऊन संशोधन करीत आहोत ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. पर्यावरण हा सातत्याने विचार करण्याचा गंभीर विषय आज सर्व ज्ञानशाखांसमोर आहे, असे मत डॉ. गोपाळ गुरु यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनास प्रारंभ झाला. यावेळी बीजभाषक म्हणून डॉ. गोपाळ गुरु यांची प्रमुख उपस्थिती होती.



दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयातील राष्ट्रीय अधिवेशनात उपस्थित मान्यवर.

डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय व मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने संयोजन केलेल्या या ३२ व्या अधिवेशनाचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. कौस्तुभ गावडे यांच्याहस्ते झाले. समारंभात डॉ. एस. एन. पवार यांचा समाजशास्त्रातील योगदानाबद्दल 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा अंक प्रकाशित करण्यात आला.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात यजमान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अधिवेशनातील परिसंवाद, शोधनिबंध वाचन यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. राहुल भगत यांनी केले. सचिव डॉ. अशोक बोरकर यांनी मानपत्राचे वाचन केले, तर डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. रमेश जाधव तसेच मीनलबेन महेता, प्र. प्राचार्य डॉ. सतिश देसाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

आभार डॉ. अर्जुन जाधव व प्रा. मयुरेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ.रुपाली सांभारे आणि डॉ. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

दक्षिण महाराष्ट्र केसरी

9921600800

7-4-2023

# डी.के.ए.एस.सी महाविद्यालयात ट्रेड फेअर व्यावसायिक उपक्रम

**इचलकरंजी :** डी.के.ए.एस.सी महाविद्यालयात कॉमर्स व बी.कॉम.आय टी विद्यार्थ्यांनी नुकताच ट्रेड फेअर हा व्यावसायिक उपक्रम हाती घेतला. ट्रेड फेअरचे उद्घाटन स्वाभिमानी विद्यार्थी परिषदचे संस्थापक सौरभ शेट्टी यांच्याहस्ते झाले. ते म्हणाले, ट्रेड फेअर या प्रत्यक्ष उपक्रमातून पदवीनंतर छोट्या मोठ्या व्यापार, व्यवसाय व नवनिर्मितीकडे युवा शक्ती आकर्षित होईल. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल पाटील होते. ट्रेड फेअरमध्ये विविध खाद्यपदार्थ, रेडीमेड कपडे, सौंदर्याच्या वस्तू, इमिटेशन ज्वेलरी, मोबाईल अॅक्सेसरीज, सेंद्रिय गुळ इ. विविध स्टॉलस् सज्ज होते. स्वयरोजगार, व्यवस्थापन, जमाखर्च व हिशेब ठेवणे, स्टॉल मांडणी व व्यवस्थापन तसेच ग्राहकांशी संवाद, संघटन कार्य, सराव इ विविध कार्ये विद्यार्थी पार पाडलीत. प्रा. मृणाली पाटील, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. मेघा माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

केसरी

9921600800

7-4-2023

# प्राचीन काळाकडे जाणाऱ्या परिस्थितीला थोपवून परिवर्तन सन्मुख व्हायला हवे : डॉ. आगलावे

**इचलकरंजी/प्रतिनिधी –**

स्वामी विवेकानंदांचे साहित्य हे सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे साहित्य आहे. त्यांचे हे विचार बंडखोर, क्रांतीवादी, तर्कशुद्ध, बुद्धिवादी आहेत. समाजशास्त्र परिषदेच्या या राष्ट्रीय अधिवेशनातून चर्चिल्या गेलेल्या विषयांशी त्यांचे नाते आहे. स्वामी विवेकानंद संस्थेच्या महाविद्यालयात असे विचारमंथन होणे ही गोष्ट अधिक मूल्ययुक्त आहे. या पार्श्वभूमीवर आज पुन्हा प्राचीन काळाकडे जाऊ पाहणाऱ्या परिस्थितीला थोपवून परिवर्तन सन्मुख व्हायला हवे, असे प्रतिपादन समाजशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर) यांनी केले.



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी येथे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. मराठी समाजशास्त्र

पान २ वर

## प्राचीन काळाकडे जाणाऱ्या परिस्थितीला थोपवून परिवर्तन सन्मुख व्हायला हवे : डॉ. आगलावे

परिषदेच्या या ३२ व्या अधिवेशनाचे संयोजन महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने केले होते. या अधिवेनशनाच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आगलावे बोलत होते.

समारोप सत्राचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी संचालक व समाजशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. आर. बी. पाटील यांनी भूषविले. अधिवेशनात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने जाहीर विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच डॉ. विनोद निरभवणे यांच्या 'झोपडपट्टी : सामाजिक समस्या' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अमरावती, नागपूर, पुणे, नांदेड, नाशिक, कोल्हापूर अशा विद्यापीठांमधून उपस्थित असलेल्या संशोधक अभ्यासक प्रतिनिधींनी अधिवेशनाच्या यशस्वीतेबद्दल मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील व संयोजक डॉ. अर्जुन जाधव यांचा परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. अशोक बोरकर, कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के आणि इतर कार्यकारिणी सदस्यांनी परिश्रम घेतले. अधिवेशनास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सहसचिव प्रशासन प्राचार्य डॉ. आर. व्ही शेजवळ, सहसचिव अर्थ प्राचार्य एस. एम. गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. रूपाली सांभारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. मयुरेश पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील यांनी केले.

तरुण भारत संवाद

शनिवार, ८ एप्रिल २०२३

# द्वेष विरहित एकसंघ समाज घडवण्याचे कार्य व्हावे

## डॉ. कौस्तुभ गावडे : डीकेएएससीमध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
इचलकरंजी

पर्यावरणाचा समतोल साधत तेढ आणि द्वेष विरहित एकसंघ समाज घडवण्याचे कार्य होण्याची गरज आहे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. कौस्तुभ गावडे यांनी व्यक्त केले.

डीकेएएससी महाविद्यालय व मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने संयोजन केलेल्या ३२ व्या अधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिसंवादात देशभरातील २५० प्राध्यापक सहभागी झाले आहेत.

बीजभाषक म्हणून इकॉनॉमिक अँण्ड पॉलिटिकल विकली, मुंबईचे मुख्य संपादक डॉ. गोपाळ गुरु यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गुरू म्हणाले, समाजशास्त्र आणि पर्यावरण एकत्रित विचार करणारे



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये मराठी समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. कौस्तुभ गावडे, समवेत प्राचार्य डॉ. अनिल पाटील, डॉ. गोपाळ गुरु, डॉ. राहुल भगत, डॉ. एस. एन. पवार व मान्यवर.

हे अधिवेशन अभिनव आहे, म्हणूनच ते अभिनंदनीय आहे. समाजशास्त्राच्या संकल्पनांपलीकडे जाऊन आपण नवे कळीचे प्रश्न घेऊन संशोधन करीत आहोत ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. पर्यावरण हा सातत्याने विचार करण्याचा गंभीर विषय आज सर्व ज्ञानशाखांसमोर आहे. आज विकासाच्या प्रक्रियेत विवेक जागा आहे पण शहाणपणाचा अभाव आहे. निसर्गाला ओरबाडणे म्हणजे आपला विनाश ओढवून घेणे हे मानवी भवितव्याच्या दृष्टीने कळायला हवे. समाजशास्त्रातील संशोधकाने या अधिवेशनात पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज याबाबत सम्यक शहाणपणाचा शोध घेतला जाणार आहे.

डॉ. प्रा. कौस्तुभ गावडे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आपले जीवन बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी समर्पित केले. पूर्व पिढ्यांच्या भक्कम पायावर उभा असलेल्या समाजाला तरुणांच्या मजबूत खांद्यांची गरज असते. आज नकारात्मक बनत असलेल्या दिशाहीन युवा पिढीला आपण एकत्रित आणायला हवे, असा मानस व्यक्त केला.

समारंभात शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. एस. एन. पवार यांचा अध्यापन, संशोधन, क्रमिक पुस्तकांचे संपादन इत्यादी समाजशास्त्रातील समृद्ध योगदानाबद्दल मराठी समाजशास्त्र परिषदेच्यावतीने जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सपत्नीक गौरव करण्यात आला. अधिवेशनात मराठी समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा २८ वा अंक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अधिवेशनाच्या औचित्याने संस्थेप्रती कृतज्ञता व समाजशास्त्र परिषदेचे आभार व्यक्त केले.

प्रास्ताविक मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत यांनी केले. सचिव डॉ. अशोक बोरकर यांनी मानपत्राचे वाचन केले. कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. रमेश जाधव तसेच मीनलबेन महेता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व समाजशास्त्राचे अभ्यासक डॉ. सतिश देसाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. अर्जुन जाधव यांनी केले. सहसमन्वयक प्रा. मयुरेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहसमन्वयक डॉ. रूपाली सांभारे, डॉ. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

तरूण भारत ८ एप्रिल

# स्वामी विवेकानंदांचे विचार तर्कशुद्ध, बुद्धीवादी

## डॉ. प्रदीप आगलावे : डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

स्वामी विवेकानंदांचे साहित्य हे सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे साहित्य आहे. त्यांचे हे विचार बंडखोर, क्रांतीवादी, तर्कशुद्ध, बुद्धिवादी आहेत. समाजशास्त्र परिषदेच्या या राष्ट्रीय अधिवेशनातून चर्चिल्या गेलेल्या विषयांशी त्यांचे नाते आहे. स्वामी विवेकानंद संस्थेच्या महाविद्यालयात असे विचारमंथन होणे ही गोष्ट अधिक मूल्ययुक्त आहे. या पार्श्वभूमीवर आज पुन्हा प्राचीन काळाकडे जाऊ पाहणाऱ्या परिस्थितीला थोपवून परिवर्तन सन्मुख व्हायला हवे, असे प्रतिपादन समाजशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर) होते.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी.के.ए.एस.सी. कॉलेज येथे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. मराठी




**इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय अधिवेशनाच्या सांगता कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रदीप आगलावे, व्यासपीठावर मान्यवर.**

समाजशास्त्र परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे संयोजन महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने केले होते.

अधिवेशनाच्या समारोप सत्राचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे माजी बी. सी.यु. डी. संचालक व समाजशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. आर. बी. पाटील यांनी भूषविले. अधिवेशनात मराठी समाजशास्त्र परिषदेच्यावतीने जाहीर झालेल्या विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच डॉ. विनोद निरभवणे यांच्या 'झोपडपट्टी: सामाजिक समस्या' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अमरावती, नागपूर, पुणे, नांदेड, नाशिक, कोल्हापूर अशा विद्यापीठांमधून उपस्थित असलेल्या संशोधक अभ्यासक प्रतिनिधींनी अधिवेशनाच्या यशस्वीतेबद्दल मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील व संयोजक डॉ. अर्जुन जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. अशोक बोरकर, कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के, इतर कार्यकारिणी सदस्यांचे योगदान लाभले.

अधिवेशनास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगीताई गावडे, सहसचिव प्रशासन प्राचार्य डॉ. आर. व्ही शेजवळ, सहसचिव अर्थ प्राचार्य एस. एम. गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. रूपाली सांभारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. मयुरेश पाटील यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ.अतिश पाटील यांनी केले.

महान कार्य

चैत्र कृ.२ स्वाती
दि.८ एप्रिल २०२३

# संविधानामुळेच मानवी हक्क अबाधित राहतात

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेजमध्ये समान संधी केंद्राद्वारे संविधान प्रबोधन संवाद कार्यशाळा झाली.कार्यशाळेत अमोल पाटील साधक व्यक्ती म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले,'स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, राष्ट्राची एकता व एकात्मता महत्त्वाची आहे.. त्यासाठी आर्थिक व सामाजिक न्याय, सन्मानाचे राहणीमान व लोकशाहीची मूल्ये ह्या बाबी भारतीयांसाठी आवश्यक आहेत.'

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अनिल पाटील म्हणाले, 'आपले संविधान म्हणजे आपला सन्मान आहे. मानवी हक्क अबाधित ठेवण्याचे कार्य संविधानातूनच होते. संविधानातील कलमांची मोडतोड वाचवण्यासाठी संविधानांचे वाचन तसेच आत्मपरीक्षण गरजेचे आहे.' कार्यशाळेत छत्रपती शाहू महाराजांच्या ऐतिहासिक निर्णयांनाही उजाळा दिला. समाज कल्याण विभागाच्या समता दूत पूजा धोत्रे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यालयीन सेवक वरुटे, समितीचे सदस्य प्रा. विशाल कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक व हेतू कथन विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इंगळे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

महान कार्य

चैत्र कृ. ३ विशाखा
दि. ९ एप्रिल २०२३

# मनुष्याने सन्मुख व्हायला हवे : आगलावे

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी येथे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या या ३२ व्या अधिवेशनाचे संयोजन महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने केले होते. सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे समाजशास्त्राचे ज्येष्ठ संशोधक मा.डॉ.प्रदीप आगलावे(नागपूर) आपल्या भाषणात म्हणाले,स्वामी विवेकानंदांचे साहित्य हे सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे साहित्य आहे.त्यांचे हे विचार बंडखोर,क्रांतीवादी, तर्क शुद्ध, बुद्धिवादी आहेत.समाजशास्त्र परिषदेच्या या राष्ट्रीय अधिवेशनातून चर्चिल्या गेलेल्या विषयांशी त्यांचे नाते आहे. स्वामी विवेकानंद संस्थेच्या महाविद्यालयात असे विचारमंथन होणे ही गोष्ट अधिक मूल्ययुक्त आहे. या पार्श्वभूमीवर आज पुंन्हा प्राचीन काळाकडे जाऊ पाहणाऱ्या परिस्थितीला थोपवून परिवर्तन सन्मुख व्हायला हवे.

अधिवेशनास संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे ,सचिव मा. प्राचार्य शुभांगीताई गावडे, सहसचिव प्रशासन, मा.प्राचार्य डॉ.आर.व्ही शेजवळ ,सहसचिव अर्थ ,मा. प्राचार्य एस. एम. गवळी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. रूपाली सांभारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. मयुरेश पाटील यांनी आभार मानले.सूत्रसंचालन डॉ.अतिश पाटील यांनी केले.

Scanned with CamScanner

लोकमत
epap...kmat.com
मंगळवार, दि. ११ एप्रिल २०२३

# विवेकानंदांचे साहित्य सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे

## डॉ. प्रदीप आगलावे : डीकेएएससीत राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** स्वामी विवेकानंदांचे साहित्य हे सामाजिक बदलांसाठी मूलभूत विचार मांडणारे साहित्य आहे. त्यांचे विचार बंडखोर, क्रांतिवादी, तर्कशुद्ध, बुद्धिवादी आहेत. या समाजशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनातून चर्चिल्या गेलेल्या विषयांशी त्यांचे नाते आहे, असे प्रतिपादन समाजशास्त्राचे संशोधक डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर) यांनी केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयातील दोन दिवसीय समाजशास्त्र राष्ट्रीय अधिवेशनाच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी संचालक डॉ. आर. बी. पाटील होते.



इचलकरंजीत डीकेएएससी महाविद्यालयातील दोन दिवसीय समाजशास्त्र राष्ट्रीय अधिवेशनाच्या सांगता समारंभात डॉ. प्रदीप आगलावे यांनी मार्गदर्शन केले.

अधिवेशनात मराठी, समाजशास्त्र परिषदेच्या वतीने जाहीर- झालेल्या विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. विनोद निरभवणे यांच्या 'झोपडपट्टी; सामाजिक समस्या' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अमरावती, नागपूर, पुणे, नांदेड, नाशिक, कोल्हापूर अशा विद्यापीठांतून उपस्थित असलेल्या संशोधक अभ्यास प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले.

संयोजक प्राचार्य अनिल पाटील व डॉ. अर्जुन जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत, अशोक बोरकर, धनंजय सोनटक्के व अन्य कार्यकारिणीचे योगदान लाभले. अधिवेशनात संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, एस. एम. गवळी यांनी मार्गदर्शन केले. अतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर मयुरेश पाटील यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ



इचलकरंजी : आदित्य सुतार याची रोलबॉल वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# रोलबॉल खेळाडू आदित्य सुतारचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू आदित्य सुतार याची ६ व्या रोलबॉल वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याच्या भारतीय संघातील निवडीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वर्ल्डकप स्पर्धेत सहभागी होण्याचा शहराला दुसऱ्यांदा बहुमान मिळाला आहे. २१ एप्रिल ते २६ एप्रिल या कालावधीत पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात ही वर्ल्डकप स्पर्धा होणार आहे. वर्ल्डकप स्पर्धेमध्ये एकूण ३२ देशांचे संघ सहभागी होत आहेत. यजमानपद असणाऱ्या भारतीय संघात आदित्यची आघाडीचा खेळाडू म्हणून निवड झाली आहे. केनिया येथे झालेल्या दुसऱ्या वर्ल्डकप स्पर्धेत सहभागी होण्याची संधी शहराला मिळाली होती. त्यानंतर यंदा दुसरा खेळाडू सहभागी झाला आहे. आदित्यला जिमखाना प्रमुख मेजर मोहन वीरकर, प्रा मुजफ्फर लगीवाले, प्रा.प्रशांत कांबळे, प्रा.ए.बी.पाटील, वडील अरुण सुतार आदींचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Main
11/04/2023 Page No. 5